# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

## छत्रपती संभाजीनगर

## परीक्षा व मूल्यमापन विभाग

## परिपत्रक

या परिपत्रकाव्दारे प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य/परिसंस्थांचे संचालक तथा परीक्षा केंद्र प्रमुख यांना मा. कुलगुरु महोदयांच्या आदेशान्वये कळविण्यात येते की, उन्हाळी-२०२४ च्या मार्च/एप्रिल, २०२४ च्या सर्व पदवी अभ्यासक्रमांच्या दि. ०२.०४.२०२४ रोजी पासुन सुरु होणार असुन सदर परीक्षा आयोजनाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सुचना करण्यात येते आहे.

१. ज्या महाविद्यालय/परिसंस्थांनी परीक्षा आवेदन पत्र ऑनलाईन इनवर्ड केलेले आहे परंतू परीक्षा शुल्काचे Mandate जनरेट करुन त्यानुसार परीक्षा शुल्काचा भरणा केलेला नसेल तर अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा प्रवेश पत्र (Hall Ticket) महाविद्यालयाच्या लॉगीन मध्ये उपलब्ध होणार नाही.

२. ज्या महाविद्यालय/परिसंस्थानी उपरोक्त अभ्यासक्रमांचे परीक्षा आवेदन पत्र इनर्वड केलेले आहे परंतु Mandate जनरेट करुन त्यानुसार परीक्षा शुल्क भरुन पुढील कार्यवाही केलेली नाही अशा सर्व महाविद्यालय/परिसंस्थांनी तात्काळ परीक्षा शुल्क भरण्याची सर्व कार्यवाही करुन परीक्षा शुल्क भरल्याची माहिती प्रचलित पध्दतीनुसार समन्वय कक्ष, परीक्षा व मूल्यमापन विभाग, विद्यापीठ परिसर यांना दि. ०१.०२.२०२४ रोजीच्या आत सादर करण्यात यावे.

३. एक ही विद्यार्थ्यांस संबधित अभ्यासक्रमाच्या परीक्षा प्रवेश पत्र (Hall Ticket) शिवाय परीक्षा देण्यास परवानगी देण्यात येऊ नये.

४. विद्यार्थ्याने पी.आर.एन. क्रमांकावर परीक्षा दिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित प्राचार्य/परीक्षा केंद्र प्रमुखांची राहील.

५. दि. ०२.०४.२०२४ रोजी पासुन सुरु होणाऱ्या पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षांसाठी परीक्षा केंद्र प्रमुखांनी विद्यापीठाने विहित करुन दिल्यानुसार सत्र निहाय ऑनलाईन पदध्दतीने उपस्थिती व अनुपस्थित अहवाल तसेच झालेल्या परीक्षार्थीची नोंदणी त्या-त्या सत्रात करणे बंधनकारक आहे. **जे परीक्षा केंद्र ऑनलाईन पध्दतीने उपस्थिती व अनुपस्थित अहवालाची नोंद करणार नाही अशा परीक्षा केंद्रांचे मार्च/एप्रिल, २०२४ परीक्षांचे देयके अदा केली जाणार नाहीत.**

६. परीक्षार्थीना परीक्षा कक्षामध्ये व परीक्षा केंद्राच्या परिसरामध्ये मोबाईल जवळ तसेच परीक्षा हॉलमध्ये मोबाईल व स्मॉर्ट वॉच वापरण्यास तथा आणण्यास प्रतिबंध करण्यात यावा. ही बाब सर्व परीक्षा केंद्रावर ठळक अक्षरांमध्ये नमूद करावी.

७. **प्राचार्य/परीक्षा केंद्र प्रमुख व सहकेंद्र प्रमुख आणि इतर तत्सम कर्मचाऱ्यांनी गोपनिय कक्षामध्ये (Examination Contral Room) मोबाईल व स्मॉर्ट वॉच वापरण्यात येऊ नये.**

८. प्राचार्य/परीक्षा केंद्र प्रमुखांनी ज्या विषयाच्या उत्तरपत्रिकांची संख्या १० किंवा त्यापेक्षा कमी असतील अशा उत्तरपत्रिका A4 साइजच्या कापडी पिशवीमध्ये प्रचलित पध्दती नुसार उत्तरपत्रिका संकलन केंद्रावर जमा करण्यात यावी. तसेच उत्तरपत्रिकांच्या प्रत्येक बंडलमध्ये संबधित विषयाची प्रश्नपत्रिका टाकण्यात यावी. तसेच प्रत्येक बंडलवर परीक्षा केंद्राचे नाव व परीक्षा केंद्र क्रमांक (College Code) स्पष्ट नमूद करण्यात यावा किंवा स्पष्ट शिक्का/सेल मारण्यात यावा.

९. **सर्व संबंधित परीक्षा केंद्र प्रमुखांनी परीक्षे दरम्यान दररोज परीक्षा झालेल्या विषयांच्या उत्तरपत्रिका संध्याकाळी ८.०० वाजेच्या आत संबधित उत्तरपत्रिका संकलन केंद्रावर जमा करणे बंधनकारक आहे.**

१०. **सर्व संकलन केंद्रांच्या संचालक/अधिकाऱ्यांनी संबधित परीक्षा केंद्रावरुन उत्तरपत्रिका आल्या किंवा नाही याची खात्री करुन घ्यावी. उत्तरपत्रिका आल्या नसतील तर संबधित परीक्षा केंद्र प्रमुखांना भ्रमध्वनीवरुन कारणमिमांसा**

**करावी. परीक्षा केंद्र जाणीव पुर्वक उत्तरपत्रिका जमा करत नसेल तर त्याबाबतचा अहवाल त्याच दिवशी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ प्रस्तुत विद्यापीठ यांना सादर करण्यात यावा**

११. सर्व संबधित परीक्षा केंद्र प्रमुख दररोज झालेल्या परीक्षांच्या उत्तरपत्रिका त्याच दिवशी संबधित उत्तपत्रिका संकलन केंद्रावर जमा करणे बंधनकारक आहे. जे परीक्षा केंद्र त्याच दिवशी उत्तरपत्रिका जमा करणार नाहीत अशा परीक्षा केंद्रांवर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ४८(५)(क) अन्वये कार्यवाही करण्यात येईल.

१२. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने विविध महाविद्यालयातील अध्यापक व अध्यापकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सेवा अधिगृहीत केल्यामुळे महाविद्यालयातील तासिका तत्त्वावरील अध्यापक (CHB) तसेच पीएच.डी. संशोधकांना परीक्षा हॉलवर पर्यवेक्षक म्हणुन नियुक्त करण्यात यावे. त्याबाबतचा अहवाल याकार्यालयास सादर करण्यात यावा.

१३. दिव्यांग परीक्षार्थीबाबत शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३०२/विशि-३, दि. ०४ मार्च, २०१७, सांकेतांक क्रमांक : 201703041316252308 अन्वये प्राचार्य/परीक्षा केंद्र प्रमुखांनी कार्यवाही करुन निर्णय घेऊन तसे संबंधित कक्ष, परीक्षा व मूल्यमापन विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना कळवावे.

१४. परीक्षा दरम्यान परीक्षा केंद्र प्रमुख/भरारी पथक/परीक्षा सहकेंद्र प्रमुख यांनी गैरप्रकरणी नोंदविलेल्या उत्तरपत्रिका अहवाल त्याच दिवशी ऑनलाईन पध्दतीने समाविष्ठ करण्यात यावा व सदर उत्तरपत्रिका पुढील ०२ दिवसात परीक्षा व मूल्यमापन विभागातील संबधित कक्षामध्ये जमा करण्यात यावे. जे परीक्षा केंद्र ही पध्दती अवलंबणार नाही त्यांच्यावर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ४८(५)(क) अन्वये गैरप्रकार प्रकरणी नियुक्त समितीसमोर शिस्तभंगाच्या कार्यवाहीसाठी सादर करण्यात येतील.

१५. परीक्षेच्या कोणत्याही प्रकारच्या कामामध्ये कसूर केल्यास महाराष्ट सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ४८(४) मधील तरतूदीनुसार संबधित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यावर कार्यवाही करण्यात येईल.

करिता, सर्व संबंधितांनी उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करुन करावी. तसेच विद्यार्थी परीक्षे पासुन वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेची राहील. याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

हे परिपत्रक विद्यापीठाच्या http://bamua.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर Circular/Notice या सदराखाली प्रसिद्ध करण्यात आले आहे.

Bharti

विद्यापीठ प्रांगण, छत्रपती संभाजीनगर : **प्रा. (डॉ.) भारती गवळी**
संदर्भ क्र. : परीक्षा व मूल्यमापन/समन्वय/२०२४/ 1636 : **संचालक**
दिनांक : २७.०३.२०२४ : **परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**या परिपत्रकाची प्रत माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्तव :**

१. मा. कुलगुरु महोदयांचे स्वीय सहायक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर
२. मा. प्र-कुलगुरु महोदयांचे स्वीय सहायक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर
३. जनसंपर्क अधिकारी, प्रशासकिय इमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर
४. कस्टोडियन, सर्व जिल्हा मुल्यांकन केंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर
५. संचालक, सर्व जिल्हा/क्षेत्रिय उत्तरपत्रिका संकलन केंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर
६. सर्व संबधित महाविद्यालयाचे प्राचार्य/परीक्षा केंद्र प्रमुख यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव
७. सर्व संबधित परीक्षा सहकेंद्र प्रमुख यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव
८. सर्व संबधित कक्ष प्रमुख, परीक्षा व मूल्यमापन विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव